.. kavIchA vadhUvarA.nsa Ahera ..

॥ कवीचा वधूवरांस आहेर ॥

मराठी वाङ्मयातील शार्दूलविक्रीडीत हा वृत प्रकार
शास्त्रोक्त पध्दतीने कसा हाताळवा याचे एक उत्तम उदाहरण
म्हणून राम गणेश गडकरी यांनी मूळ संस्कृत काव्य
पंक्तिंचे केलेले हे स्वैर भाषांतर १९०८ मध्ये
लिहिलेले येथे सादर करीत आहे.

॥ कवीचा वधूवरांस आहेर ॥
राम गणेश गडकरी - “गोविंदाग्रज”
श्रीमन्मङ्गल मंगलप्रद असे जेथें उभा सर्वदा ।
मोदें तेविं सदा सदाश्रितपदा श्रीशारदा सर्व - दा, ।
पद्माहो करि सद्म ज्यास अपुले त्या मंडपीं मंगल -
जोडी मंगल कार्य मंगलातरा चिन्मंमंगला मंगल ! ॥ १॥
गौधा, यमुना, सुकिर्ति विजया, चंद्रास तारा रवा, ।
अर्थातें प्रतिभा , कवीस कविता , स्वर्गा धरा सुंदरा, ।
आत्मारामदासि मुक्ति मिळतां जो हर्ष वाटे जना, ।
देवो तेविं अपूर्व योग तुमचा तो सर्वथा सन्मना ! ॥ २॥
श्रध्दा साधुजनी, तया गुरुजनीं नम्रत्व विद्वज्जनीं, ।
सेवा सेव्यजनीं , दया निजजनीं , स्नेहाद्रता सज्जनीं , ।
माया दीनजनीं , क्षमा परजनीं, सुप्रेम साऱ्या जनीं ,।
ऐशा निर्मल सदगुणांप्रति सदा आधार द्या स्वा मनीं. ॥ ३॥
मातातात जगांत वागति, न तें होई तुम्हांते पुरें , ।
तन्मार्ग क्रमिला यथाविधि, तरि कर्तव्य थोडें उरें ।
त्यांनीं वाढविले तुम्हांस; ऋण हे तुम्हांवरी राहि; जें -।
बाळें वाढवुनी तुम्हांसम गुणी, ते फेडिले पाहिजे. ॥ ४॥
आलें चालत जें क्रमागत कुळीं त्या सद्योशोवैभवा - ।
रक्षा दक्षपणें ; सुलक्षगणें लक्षैकधा वाढवा ।
ठेवा सुस्थिर वैभवा , परि करा त्या सद्यशा चंचल . ।
यावच्चन्द्रदिवाकरौ पसरुनी आसेतुहैमचल ! ॥ ५॥
जैसा मस्तकिं या सुरक्तधवला मंत्राक्षरा अक्षता ।
तैशी सत्कृतिसंघवृष्टीकरणीं ठेवा सदा दक्षता .॥
जैसा गर्जत वाद्यनाद सुयशा तैसें जगीं गाजवा ।
प्रेमें सुस्थिरशा चिरंतनयशा ऐशा ध्रुवा लाजवा! ॥ ६॥

मालादान न हें ; परस्पर परी सर्वस्व संतर्पण ! ।
केलें गुंफुनि सदगुणांहीं सुमनें हें नित्य आत्मार्पण ! ।
गंगायमुना ओघ भिन्न असतां एकत्र होती यथा ।
झालां त्यापरि एकरूप इथुनी ; आतां न व्हा अन्यथा! ॥ ७॥
जें जें सुंदर जें सुखप्रद तसें जें जें महन्मंगल ! ।
जें जें वांच्छित जें अभंग जगिं तें देवो तुम्हा मंगल ! ।
आशीर्वाद सहर्ष वर्षित असा ज्या मान्य आहे रसा ।
“ गोविंदग्रज, ” शब्दहार करि हा सामान्य आहेरसा ! ॥ ८॥
कवी “गोविंदाग्रज” उर्फ राम गणेश गडकरी

Encoded and proofread by
Shurin Usgaonkar usgaonkar at hotmail.com

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated September 8, 2005